पिंपळनेर पो. स्टे. भाग-६ गुरन 3076/2020
भ्र.प्र. अधि. १९८८ (संशोधन अ. २०१८) चे कलम. ७ प्रमाणे



पोलीस निरिक्षक, सहाय्यक पिंपळनेर पोलीस स्टेशन

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** पिंपळनेर **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0164 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/09/2020 16:47 बजे

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 03/09/2020
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/09/2020
   **Time From (वेळेपासून):** 16:47 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:47 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/09/2020 **Time (वेळ):** 16:50 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 022 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/09/2020 22:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):** -

(b) **Address (पत्ता):** िपपंळनेर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शशीकांत पंढरीनाथ सोनार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1977 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.(अ.** | **Id Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **Id Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

फिर्याद  पिंपळनेर पोलीस स्टेशन जि.धुळे
दिनांक :- ०३/०९/२०२०

मी श्री.शशिकांत पंढरीनाथ सोनार, वय ४३ वर्षे, धंदा व्यापार रा. पंचमुखी कॉर्नर, शहादा पिपल्स बॅंके समोर, सटाणा रोड, पिंपळनेर, ता.साक्री जि.धुळे मो.नं. ७७९८४६५४१२

समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटूंबासह राहतो. माझा होलसेल अंडे विक्री, गोळी बिस्कीटचा व्यापार आहे. त्यावर आम्ही उदरनिर्वाह करतो.

मी श्री.अनिल प्रेमसिंग परदेशी यांचे मालकीचे प्लॉट नं. १९, सुशिल चित्र मंदीरामागे पिंपळनेर येथील राहते घर माहे जुन २०२० मध्ये त्यांचेकडुन विकत घेतले असुन घराचे विज कनेक्शन मिटर श्री.अनिल प्रेमसिंग परदेशी यांचे नांवे आहे. सदर विज कनेक्शन मिटर बंद करुन नविन विज कनेक्शन मिटर माझे नांवे करण्यासाठी मी एमएसईबी कार्यालय पिंपळनेर येथील इंजीनिअर श्री.संजय माळी यांचेकडेस अर्ज सादर केला असता, इंजीनिअर श्री.संजय माळी यांनी नविन विज कनेक्शन मिटर माझे नांवे करण्यासाठी माझेकडे ४,५००/- रु. लाचेची मागणी केलेली आहे. परंतु मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. माझा इंजीनिअर श्री. संजय माळी यांचेशी कोणताही वाद नसुन उसनवारीचा व्यवहार नाही.

तरी मी आज दि.०३/०९/२०२० रोजी एम.एस.ई.बी.कार्यालय, पिंपळनेर येथे जावुन इंजीनिअर श्री. संजय माळी यांची भेट घेवुन माझे वरील कामासंदर्भात चर्चा करणार आहे, दरम्यान त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करणेकरिता दि.०३/०९/२०२० रोजी पोलीस निरीक्षक श्री.प्रकाश झोडगे यांना लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, धुळे येथे माझे स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार दिली.

माझे तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई करणे असल्याने पोलीस निरीक्षक श्री.प्रकाश झोडगे यांनी दोन शासकीय पंचांना बोलावुन घेतले. त्यावेळी पंच(१)श्री.विजय पाटील व पंच(२)श्री.युवराज पाटील यांची स्टाफची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री.झोडगे यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीगत सांगुन मी दिलेली लेखी तक्रार पंचांना वाचण्यास दिली. सदर तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी व श्री.झोडगे यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर श्री.झोडगे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरची सविस्तर माहिती देवून मला व पंच नं.१ श्री.विजय पाटील यांना पिंपळनेर गावातील पिंपळनेर ते साक्री रस्त्यावरील अन्नपुर्णा पेट्रोल पंपाजवळुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून इंजिनिअर श्री.संजय माळी, एम.एस.इ.बी कार्यालय पिंपळनेर यांची पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यांत येणार असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे मी, पंच नं.१ श्री.विजय पाटील असे माझे मोटार सायकलीने आणि आमचे मागोमाग श्री.झोडगे, पंच नं.२ श्री.युवराज पाटील व स्टाफ असे पिंपळनेर गावातील पिंपळनेर ते साक्री रस्त्यावरील अन्नपुर्णा पेट्रोल पंपाजवळ आलो. तेथुन पडताळणी करण्याकरिता मला व पंच नं.१ श्री.विजय पाटील असे आम्हाला श्री.झोडगे यांनी सुचना देवून, व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून माझे मोटार सायकलीने एम.एस.इ.बी पिंपळनेर कार्यालयात इंजिनिअर श्री.संजय माळी यांचे भेटीकरीता रवाना केले. त्यावेळी श्री.झोडगे, पंच नं.२ श्री. युवराज पाटील व स्टाफ असे अन्नपुर्णा पेट्रोल पंपाजवळ वाहनात थांबुन राहीले.

पडताळणी दरम्यान मी व पंच नं.१ श्री.विजय पाटील असे माझे मोटार सायकलीने एम.एस.इ.बी पिंपळनेर कार्यालयात गेलो असता तेथे इंजिनिअर श्री.संजय माळी यांना नमस्कार करुन मला नविन विज कनेक्शन मीटर मिळवुन देण्यासाठी श्री.संजय माळी यांनी माझ्याकडे तडजोडीअंती ४,०००/- रुपये लाचेची मागणी करुन लागलीच आणुन देण्यास सांगितलेनंतर आम्ही परत आलो. तेथे आम्ही दोघांनी सांगीतलेल्या हकीगतीवरून व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये माझेत श्री.संजय माळी यांचेत रेकॉर्ड झालेले संभाषण श्री.झोडगे, पंच व आम्ही सर्वांनी ऐकल्यानंतर माझेकडे श्री.संजय माळी यांनी ४,०००/- रुपये आणुन देण्याचे सांगितल्याची खात्री झाल्यानंतर श्री.झोडगे यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना देवुन माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम ४,०००/- रू. (त्यात ५००/-रु.दराच्या ८ चलनी नोटा) घेतल्या. सदरची रक्कम मी माझे घरखर्चाचे बचतीतुन उपलब्ध करून दिली आहे. सदर नोटांचे क्रमांक नोंदवुन, नोटांना अॅंथ्रासिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तद्नंतर लाचेच्या नोटांना अॅंथ्रासिन पावडर लावून सदर रक्कम माझे पॅन्टचे उजवे खिशात ठेवण्यात आली. श्री.संजय माळी यांनी लाच रक्कम स्विकारल्यावर माझे डावे हाताने डोक्यावर हात फिरवुन लाच स्विकारल्याचा सापळा पथकास इशारा करणेबाबत व सदर इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहात पकडतील असे सांगण्यात आले. तसा श्री.झोडगे यांनी पडताळणी व सापळापुर्व पंचनामा करून सापळा कारवाईचे नियोजन केले.

54

पोलीस निरीक्षक पिंपळनेर पोलीस स्टेशन

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | पचंमूखी का सटाणा रोड िपपंळनेर ,पिंपळनेर ,धुळे,महाराष्ट्र,424306,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | पचंमूखी का सटाणा रोड िपपंळनेर ,पिंपळनेर ,धुळे,महाराष्ट्र,424306,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सजंय कौतीक माळी | | | 1. स्वामी िववेकानंद का करगांव रोड, चाळीसगांव िज जळगांव ,पिंपळनेर , धुळे,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/Informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 4000/ रु लाचेची रककम | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 0.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्कुवेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वरील ता वेळी व ठीकाणी यातील तक्रार दार यांनी त्याचं◌े मालकीचे प्लाट न 19 सूशील चीत्र मंदीर मागे िपपंळनेर येथील राहते घर माहे - जून2020 मध्ये िवकत घेतले असून सदर घराचे िवज कनेक्शन िमटर अनील प्रेमजी परदेशी यांचे नावे आहे सदर िवज कनेक्शन िमटर बंद करून नवीन िवज कनेकशन िमटर तक्रारदार यांचे नावे करण्यासाठी तक्रार दार यं◌ानी म रा वी वी कंपनी मर्या िपपंळनेर शहर कक्ष येथील सहा अभी संजय माळी यांचेकडेस अर्ज सादर केला असता सहा अभीयंता यांनी नवीन िवज कनेक्शन िमटर तक्रारदार यंचे नावे करण्यासाठी 4050/- रु लाचेची ची मागणी केली सदर तक्रारीच्या अनूषगाने आज िद रोजी पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचे कडे लोकसेवक यांनी तडजोडी अंती 4000/- रु ची मागणी करून सदर लाचेची रक्कम पंच साक्षीदारासमक्ष समक्ष स्वीकारतांना रंगेहात पकडतांना आले आहे

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** **(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** PRAKESH LAXMAN ZODGE
**Rank (पद):** I (Inspector)
**No.(क्र.):** 1981 **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

त्यानंतर लागलीच श्री.झोडगे यांनी सुचना देवुन मला अन्नपुर्णा पेट्रोल पंपाजवळुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून मला व पंच नं.१ श्री.विजय पाटील अशांना श्री.संजय माळी यांना लाच रक्कम देण्याकरिता रवाना करणार असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे मी व पंच नं.१ श्री.विजय पाटील आम्हाला श्री.झोडगे यांनी सुचना देवून, व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून माझ्या मोटार सायकलीने रवाना केले आणि आमचे मागोमाग श्री.झोडगे, पंच नं.२ श्री.युवराज पाटील व स्टाफ असे शासकीय वाहनाने कार्यालयाजवळ काही अंतरावर येवुन वाहन रोडाचे बाजुला थांबवुन पायी चालत येवुन कार्यालयाचे आजुबाजुला आवारात तसेच कार्यालयाचे मुख्य प्रवेश व्दाराजवळ थांबुन राहीले. मी व पंच नं.१ श्री.विजय पाटील असे श्री.संजय माळी यांना भेटण्यासाठी एम.एस.ई.बी. कार्यालयात गेलो असता श्री.संजय माळी यांनी माझ्याकडे ईशाऱ्याने लाचेची रक्कम मागितली म्हणुन मी माझे पॅन्टचे उजवे खिशातुन अँथ्रासिन लावलेली लाचेची रक्कम ४,०००/- रू. काढुन श्री.संजय माळी यांचे समोर धरली असता, त्यांनी त्यांचे डावे हाताने लाचेची रक्कम स्विकारून, त्यांचे डावे हातात धरुन ठेवली. त्यानंतर मी कार्यालयाचे दरवाजात येवुन सापळा पथकास माझे डावे हाताने माझे डोक्यावरुन हात फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा केला. सदर इशारा देताच श्री.झोडगे, पंच नं.२ श्री.युवराज पाटील व सापळा पथकातील कर्मचारी असे कार्यालयात आले. तेथे माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारलेले श्री.संजय माळी यांना माझे व पंच नं.१ श्री.विजय पाटील यांचे सांगणेकरुन श्री.झोडगे यांचे सुचनेवरुन सापळा पथकाने अटकावुन ठेवले.

त्यानंतर अटकावुन ठेवलेले तथा माझेकडुन ४,०००/- रू. लाच स्विकारलेले इंजिनिअर श्री.संजय माळी यांना श्री.झोडगे यांनी त्यांची, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख देवुन, त्यांना त्यांचे नांव गाव विचारता, त्यांनी त्यांचे नाव संजय कौतिक माळी, वय ५१ वर्षे, सहाय्यक अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी लि. ३३/११ के.व्ही उपकेंद्र पिंपळनेर शहर कक्ष पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे रा.व्दारा रविंद्र लक्ष्मण रामोळे, अलंकापुरी नगर, एअरटेल टॉवरजवळ, सटाणा रोड पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे यांचे घरात भाडेतत्वावर मुळ पत्ता २६, स्वामी विवेकानंद कॉलनी, करगाव रोड, चाळीसगाव जि.जळगाव असे सांगितले आहे.

त्यानंतर श्री.झोडगे यांचे सुचनेवरुन सापळा पथकाने श्री.संजय माळी यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. तसा श्री.झोडगे यांनी पिंपळनेर पोलीस स्टेशन येथे सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा केला आहे.

तरी दि.०३/०९/२०२० रोजी लोकसेवक संजय कौतिक माळी, वय ५१ वर्षे, सहाय्यक अभियंता, म.रा. वि.वि.कंपनी लि.३३/११ के.व्ही.उपकेंद्र पिंपळनेर शहर कक्ष पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे रा.व्दारा रविंद्र लक्ष्मण रामोळे, अलंकापुरी नगर, एअरटेल टॉवरजवळ, सटाणा रोड पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे मुळ रा. २६, स्वामी विवेकानंद कॉलनी, करगाव रोड, चाळीसगाव जि.जळगाव यांनी मला नविन विज कनेक्शन मीटर मिळवुन देण्यासाठी श्री.संजय माळी यांनी माझ्याकडे तडजोडीअंती ४,०००/- रुपये लाचेची मागणी करुन आज दि. ०३/०९/२०२० रोजी सुमारे १६.४७ वाजता म.रा.वि.वि.कंपनी लि.३३/११ के.व्ही.उपकेंद्र पिंपळनेर शहर कक्ष पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे येथील सहाय्यक अभियंता यांचे कक्षात पंचासमक्ष स्विकारुन स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करुन अनाधिकाराने पदाचा दुरुपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील संगणीकृत फिर्याद मी वाचुन पाहिली असुन ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

ही फिर्याद दिली / सही
दि. ०३/०९/२०२०
(शशिकांत पंढरीनाथ सोनार)
रा.पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे

समक्ष
प्रकाश झोडगे,
पोलीस निरीक्षक, लाप्रवि धुळे

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): DILIP NAMDEV KHEDKAR
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH